# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Women in distressed situation**

**Police Station** :- **Karanja Gramin**

**Date of Good Work done** :- **22/11/2021**

**Brief of the work done :-**

जिल्हयात स्थापन करण्यात आलेल्या निर्भया पथकाने कारंजा येथील अल्पवयीन मुलीने ई मेल करून पोलिसांची मदत मागितली होती सदर मुलीच्या तक्रारीची तत्काळ दखल घेऊन पोलिसांनी तत्काळ मदत पोहचून त्यांचे तक्राररीचे निरसन केले असून त्यामुळे पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेचे पालकांनी आभार मानून समाधान व्यक्त केले. अशा संकटाचे वेळी 100/112 वर कॉल किंवा 8605878254 या क्रमांकावर व्हॉट्स ऍप संदेश करू शकतात.



लोकमत

# ई-मेल तक्रारीची पोलिसांकडून दखल; कॉल करणाऱ्याला दिली समज!

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** अनोळखी व्यक्तीकडून वारंवार फोन तसेच व्हिडिओ कॉल येत असल्याची तक्रार कारंजा येथील नववीच्या मुलीने ई-मेलने पोलिसांकडे करताच, याची दखल घेत मोबाइल क्रमांकाच्या लोकेशनद्वारे कॉल करणाऱ्याचा शोध घेण्यात आला. मोबाइल क्रमांकातील आकडे हे थोडेफार सारखेच असल्याने चुकून कॉल लागल्याचे स्पष्टीकरण संबंधित इसमाने दिले.

कारंजा येथे इयत्ता नववीत शिक्षण घेणाऱ्या एका मुलीच्या मोबाइलवर एक अनोळखी व्यक्ती वारंवार फोन करून तसेच व्हिडिओ कॉल करून त्रास देत होता. या मुलीने पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या ई-मेलवर या घटनेची माहिती दिली. पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी तत्काळ मुलीच्या तक्रारीची दखल घेऊन पोलीस यंत्रणा याकामी लावली. महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी कार्यरत असलेल्या कारंजा येथील निर्भया पथकाला तत्काळ सूचना करून या मुलीच्या मदतीसाठी जाण्याचे निर्देश दिले. कारंजा येथील निर्भया पथकाने मुलीची तक्रार समजून घेतली. सायबर सेल वाशिमकडून संबंधित इसमाचे लोकेशन घेतले असता, गुजरात राज्यातील पिपोदरा येथील अनोळखी इसम असल्याचे निष्पन्न झाले. कारंजा येथील नववीत शिकणाऱ्या मुलीच्या मोबाइल क्रमांकातील आकडे हे थोडेफार सारखेच असल्याने चुकून कॉल लागल्याचे त्या अनोळखी व्यक्तीने सांगितले. अनोळखी व्यक्ती व त्याच्या लोकेशनबाबतची माहिती कारंजा येथील निर्भया पथकाने मुलीच्या घरी जाऊन तिच्या आई-वडिलांना दिली.

### .. तर नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा

ही कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनात कारंजा (ग्रामीण) पोलीस निरीक्षक धंदर, पोलीस उपनिरीक्षक धोंगडे, अंभोरे, पोलीस हवालदार महेंद्र रजोदिया व चमूने केली. जर कोणी व्यक्ती महिला व मुलींना त्रास देत असेल, पाठलाग करीत असेल तर त्यांनी तत्काळ पोलीस हेल्पलाइन नंबर १०० किंवा ११२ तसेच वाशिम नियंत्रण कक्ष येथे संपर्क साधावा असे आवाहन वाशिम पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या स्थानिक गुन्हे शाखेने केले.

Hello Washim
Page No. 1 Nov 23, 2021
Powered by: erelego.com